RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ७५] सोमवार, जून ५, २०२३/ज्येष्ठ १५, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २१७

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ जून, २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीपीए ०४२२/प्र.क्र.९१/राउशु-२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा ) मधील कलम १४३ च्या पोट-कलम ( ३ ) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धिशिवाय हे नियम करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा ) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) च्या परंतुकासह पोट-कलम (२) च्या खंड (बी), (एफ), (जी), आणि (एच १) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना महाराष्ट्र देशी मद्य (सुधारणा) नियम, २०२३ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ (यापुढे यास प्रधान नियम असे संबोधावे) च्या नियम २५ मधील, खंड (क) मध्ये,-

(i) पहिल्या परंतुकातील "१५ टक्क्यांपेक्षा जास्त असता कामा नये." या शब्द व अंकाऐवजी "३० टक्क्यांपेक्षा जास्त असता कामा नये" हे शब्द व अंक समविष्ट करावेत आणि ते दिनांक २९ डिसेंबर,२०१६ पासून बदलले गेले असे मानले जाईल ;

(ii) दुसऱ्या परंतुकातील "१५ टक्क्यांपेक्षा जास्त असता कामा नये." या शब्द व अंकाऐवजी "३० टक्क्यांपेक्षा जास्त असता कामा नये" हे शब्द व अंक समविष्ट करावा आणि ते दिनाक २९ डिसेंबर,२०१६ पासून बदलले गेले असे मानले जाईल ;

(iii) तिसऱ्या परंतुकातील “१५ टक्क्यांपेक्षा जास्त असता कामा नये." या शब्द व अंकाऐवजी “३० टक्क्यांपेक्षा जास्त असता कामा नये." हे शब्द व अंक समविष्ट करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

**HOME DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated 5th June, 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. BPA-0422/CR-91/EXC-2.- Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, should be brought into force at once, and therefore the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949).

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (b), (f), (g) and (hl) of sub-section (*2*) read with proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Country Liquor (Amendment) Rules, 2023.

2. In rule 25 of the Maharashtra Country Liquor Rules, 1973, in clause (c),—

(i) in first proviso, for the words and figure "not exceed 15 per cent." the words and figure "not exceed 30 per cent." shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 29th December, 2016 ;

(ii) in second proviso, for the words and figure "not exceed 15 per cent." the words and figure "not exceed 30 per cent." shall be substituted and shall be deemed to have been substituted with effect from the 29th December, 2016 ;

(iii) in third proviso, for the words and figure "not exceed 15 per cent." the words and figure "not exceed 30 per cent." shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.